एक ऐतिहासिक विश्व विक्रम - दादांचे सुवर्णमहोत्सवी चित्रपट

A Project Submitted to,

(स्वायत्त) कोल्हापूर

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

# (AUTONOMOUS)

For the Degree of Bachelor of Arts

in

HISTORY

by


AARYAN RAVINDRA JADHAV


Under the Guidance of

DR. S. R. KATTIMANI

Head Dept. Of History, Vivekanand College, Kolhapur

२०२३

# "HISTORICAL SIGNIFICANCE OF BOMBAY KARNATAKA TO INDIAN FREEDOM MOVEMENT


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | घटक | पान नं. |
|---|---|---|
| १ | प्रतिज्ञा पत्र | |
| २ | प्रस्तावना | |
| ३ | उद्दिष्टे | |
| ४ | पूर्व संशोधनाचा आढावा | |
| ५ | गृहीतके | |
| ६ | संशोधन पध्दती | |
| ७ | दादांचे बालपण | |
| ८ | दादांचे सुवर्ण महोत्सवी चित्रपट | |
| ९ | दोन मराठी सम्राट यांचं अनोखं नातं हिंदुहृदय सम्राट माननीय श्री बाळासाहेब ठाकरे आणि दादासाहेब कोंडके यांचा एक सुंदर फोटो | |
| १० | प्रमाणपत्र | |



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रतिज्ञा पत्र

मी आर्यन रविंद्र जाधव, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो की सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प एक ऐतिहासिक विश्वविक्रम दादासाहेब यांचे सुवर्णमहोत्सवी चित्रपट हा मी स्वत: क्षेत्रभेट घेवून व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेवून तयार केला आहे. पूर्वी सदर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडूनही लिहून घेवून हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही.

दिनांक : १९ / ४/२०२३

ARJ
आर्यन रविंद्र जाधव

ठिकाण :

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रस्तावना

आजच्या जगात चित्रपट व्यवसायात प्रथम स्थानी आपला भारत देश आहे. कारण जगात सर्वाधिक चित्रपटनिर्मीती भारतात होते. जवळजवळ १९२० च्या दशकांत चित्रपटाची सुरुवात झाली. पुढे मग महाराष्ट्र, प्रभात यांसारखे चित्रपटनिर्मातीच्या संस्था उदयास आल्या. त्यांनी पौराणिक व धार्मिक विषयाच्या चित्रपटांची निर्मीती केली. त्यानंतर भालजी पेंढारकर यांनी जयप्रभा स्टूडिओतून शिवचरित्रावर आधारित, तसेच सामाजिक विषयाचे चित्रपट बनवले. त्यानंतर १९६५ ते ७५ मध्ये रंगभूमीवर एकच वगनाट्य गाजत राहिलं आणि त्याच *विच्छा माझी पूरी करा* या वगामुळेच एक विनोदाची पायाभरणी करणारा कलाकार महाराष्ट्राला परिचित झाला. तो वसंत सबनीस लिखीत छपरी पलंगाचा वग होता. ज्याचे नाव बदलून *विच्छा माझी पूरी करा* असे ठेवले होते. ते कलावंत म्हणजेच महाराष्ट्राचे लाडके दादा कोंडके.

दादा एक हजरजबाबी विनोदी अभिनेता आरती गीत संवाद लेखक आणि एक यशस्वी चित्रपट निर्माता दिग्दर्शक दादांची हीच प्रतिमा जनमानसात बिंबवली आहे पण दादा कोंडके म्हणजे फक्त एवढेच नाही ते फार मोठं व्यक्तीमत्व होत दादांच्या आयुष्यात प्रचंड विविधता व ती फार कमी माणसांच्या आयुष्यामध्ये अशी विविध आढळते.

दादांनी आपल्या द्विअर्थी विनोदी शैलीतून प्रचंड हासवले. त्याच्यांच सलग नऊ सुवर्णमहोत्सवी ठरलेल्या ऐतिहासिक विश्वविक्रमी चित्रपटांचा आढावा प्रस्तुत प्रकल्पात घेण्यात आलेला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# उद्दिष्टे

१) दादांच्या सुवर्णमहोत्सवी विनोदी चित्रपटांविषयी जाणून घेणे.

२) दादांची रूपेरी पडद्यावरील व वास्तविकतेतील प्रतिमा अभ्यासणे.

३) दादांचा कोल्हापूराशी संबंध याबाबत जाणून घेणे.

४) इतर नटांपेक्षा वेगळा चाहतावर्ग असणारा दादा कसा घडला याबाबत जाणने.

VEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964

# पूर्व संशोधनाचा आढावा

१) महाराष्ट्राचे लाडके व दिग्गज विनोदी कलावंत दादासाहेब कोंडके यांच्यावर सौ. अनिता पाध्ये यांनी *एकटा जीव* या दादांच्या आत्मचरित्राचे लेखन केले आहे. यामध्ये दादांच्या जन्मापासून अखेरपर्यंतचा संपूर्ण प्रवास लेखिकेने आपल्या लेखणीतून मांडला आहे. या ग्रंथाचे आजवर अकरा आवृत्या प्रकाशित व लोकप्रिय झाल्या आहेत.

# गृहितके

१) दादांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या सोंगाड्या पासून ते आली अंगावर. या चित्रपटांपर्यंतचा थोडक्यात आढावा प्रस्तुत प्रकल्पात घेण्यात आलेला आहे.

२) सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, आंधळा मारतो डोळा, पांडू हवालदार, तुमचं आमचं जमलं, राम राम गंगाराम, बोट लाविन तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे आणि आली अंगावर हे सलग नऊ चित्रपट ५० हून जास्त आठवडे चित्रपटगृहात धुमाकूळ घालणारे आर्थातच सुवर्णमहोत्सवी आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ★ ESTD JUNE 1964 (Autonomous)

# संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकल्पासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरली आहे. यासाठी लघुप्रकल्पाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधनांचा अभ्यास यांतून केला गेला आहे.

प्रस्तुत प्रकल्पासाठी दादांच्या एकटा जीव या आत्मचरित्राचा अभ्यास कामी आला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# दादांचे बालपण

दादासाहेबांचे पूर्ण नाव दादासाहेब खंडेराव कोंडके त्यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ साली. मुंबईतील वाडिया हॉस्पिटल मध्ये झाला त्यांच्या आईचे नाव सखुबाई दादासाहेबांच्या शाळेतील एक फार महत्त्वाची आठवण म्हणजे त्यांनी एक खूप भारी कविता केली होती. ती खालील प्रमाणे,

- होते सुंदर एक फुले
- बागी झाडावरी
- शोभा ते अपूर्व अशी
- पृथ्वीस देई रवी खुश करण्या
- एसी मनी येउन
- गेलो तोड़ घोडाया
- नजीक बदला वृक्ष
- मला पाहुनी अहो
- तोडू नका उगाच फुल ते
- आश्चर्य माझे असे
- मातीमोल ठरेन मी
- मजसवे करताक्षणी बिलगते
- झाडाचे एकूण बोल असेल
- जाण्याकरिता घरी पुढती पाऊल
- टाकते फुल वदे ध्या

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

- हो मला घ्या करी
- तोडावे जर फुल
- झाड म्हणाले हा होईन विद्रूप मी
- माझी सुंदरता क्षणात
- सगळी जाईल हरपुनी
- की तोडावे न जरी
- म्हणे फुल ते घ्या हो
- तुम्ही घ्या मला उपयोगी
- प पडण्या तुम्हास्तव
- असे मी जन्म हा घेतला
- तोडू का नच तोडू फुल मजला मोठा पडे हा प्रश्न याचे उत्तर झडकरी मज कुणी पद्यात देईल का

हि अशी सुंदर कवीता दादांनी केली होती त्यांच्या शिक्षकांचा त्यांच्यावरती विश्वास बसत नव्हता कि हि कविता दादा ने लिहली आहे शिक्षकांनी त्यांच्याकडून पुरावा मागितला तु हि कविता लिहली आहेस ती सिद्ध करून दाखव मग दादा नी पुरावा म्हणून कविता करत असताना ज्या ओळी तील बदल खाडा खोड कच्च लिखाण हे सर्व दाखवलं मग शिक्षकांचा विश्वास त्यांच्यावर बसला नंतर त्यांनी दादांच फार कौतुक केलं

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# दादासाहेबांची कारकीर्द

दादा कोंडके हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते.

व्हाईट कॉलर्ड पांढरपेशा वर्गाला त्यांच्या कमरेखालच्या विनोदांनी त्यांच्या सिनेमापासून दूरच ठेवले. पण त्यांच्या खूप प्रेक्षकांनी त्यांना जे डोक्यावर उचलून घेतले त्यानेच त्यांची कारकीर्द यशस्वी करवली. द्विअर्थी विनोदाकडे झुकणारे संवाद, चित्रपटातल्या तारिकेशी पडद्यावरची नको तितकी घसट व ह्या सर्वांमुळे सतत सेन्सॉर बोर्डाशी उडणारे वाद यांनी त्यांच्या चित्रपटांना सतत निगेटिव्ह प्रसिद्धी मिळत राहिली. त्या प्रेक्षकांना या सर्वांशी काही देणे घेणे नव्हत. दादांचा प्रेक्षक वर्ग ठरलेला होता. दूरदर्शन पण नसलेल्या काळात दिवसभर घाम गाळून विरंगुळ्याच्या चार क्षणांसाठी पिटात शिट्या वाजवत 'गंगू'च्या तंगड्यांची चर्चा करणारा वर्ग हा त्यांच्या चित्रपटाचा 'मायबाप' होता.

८ ऑगस्ट १९३२ ला जन्मलेल्या दादा कोंडकेचे खरे नांव कृष्णा कोंडके होते. नायगाव मुंबईच्या मिलमजूर कामगाराच्या घरात गोकुळाष्टमीला जन्मलेल्या ह्या "कृष्णा" ने नावाचे सार्थक मराठी चित्रपट सृष्टीच्या पडद्यावर दाखवून दिले. बँड पथकातून सुरुवात करून हळूहळू वगनाट्ये, नाटके ह्यांनी सुरुवात केलेल्या दादांचे चित्रपट जीवन मेहनतीने साकारले गेले. नाटकांच्या निमिताने केलेल्या राज्यभराच्या दौऱ्यांनी दादांना सर्वसामान्यांसाठी करमणुकीचे महत्त्व व कोसा-कोसांवर बदलत जाणारी रसिकता कळली व हेच पुढे त्यांच्या यशाचे गमक सिद्ध झाले.

दादांचे बालपण नायगावच्या मराठी कामगार वस्तीतल्या चाळीत गेले. लहानपणापासून खोड्याळ (काहीसे मवाली) असलेल्या दादांनी 'अपना बाजार' येथे

ESTD JUNE 1964 (Autonomous) KOLHAPUR

नोकरी केली. सोडावॉटर बाटल्या.... नायगाव परिसरात "बँडवाले दादा" या नावाने त्यांना लोक ओळखू लागले. तेथेच त्यांना जीवाभावाचे मित्र मिळाले. सुपरस्टार झाल्यावरही दादा तेथे जात व जुन्या मित्र मंडळीत रमत..

कलेची सेवा बँड पथकाच्या मार्फत करणाऱ्या दादांनी मग 'सेवा दलात' प्रवेश केला. तेथून सांस्कृतिक कार्यक्रम व नंतर नाटके असा त्यांचा प्रवास सुरू झाला. दादा कोंडके यांनी 'दादा कोंडके आणि पार्टी" नावाचे एक कला पथकही काढले. प्रख्यात लेखक वसंत सबनिसांशी ते याच संदर्भातून जोडले गेले. स्वतःची नाटक कंपनी उघडून त्यांनी वसंत सबनिसांना नाटकासाठी लेखन करावयास विनंती केली. तोवर वसंत सबनिसांना त्यांच्या "खणखणपूरचा राजा" ह्या नाटकातल्या भूमिकेने प्रभावित केलेलेच होते. हसरे व खेळकर व्यक्तिमत्व लाभलेल्या दादा कोंडकेसाठी सबनिसांनी मदतीचा हात पुढे केला. सबनिसांनी लिहिलेल्या "विच्छा माझी पुरी करा" या नाटकाने दादांना सुपरस्टार रंगकर्मी बनवले. १५०० च्या वर प्रयोग झालेल्या या नाटकामुळे दादांना भालजींच्या चित्रपटात काम करण्याची संधी प्राप्त झाली. आशा भोसले 'विच्छा.... 'चा मुंबईतला एकही प्रयोग सोडीत नसत. त्यांनीच दादांना भालजींकडे पाठवले. दादांचे शब्दोच्चार एके ५६ रायफलमधून सुटणाऱ्या गोळ्यांसारखे सुसाट असायचे, पण नेमक्या ठिकाणी पॉज घेतल्याने प्रेक्षक अख्खे थिएटर (मग ते नाटकाचे असो की सिनेमाचे) डोक्यावर घ्यायचे.

१९६९ साली भालजी पेंढारकरांच्या "तांबडी माती" ह्या चित्रपटातून पदार्पण केलेल्या दादांनी मग मागे वळून बघितले नाही. तांबडी माती पाठोपाठ आलेल्या "सोंगाड्या - (१९७१)" ने दादांचे आयुष्य बदलून टाकले. 'सोंगाड्या' ही त्यांची प्रथम निर्मिती. वसंत सबनिसांनी लिहिलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन गोविंद कुळकर्णींनी केले

ESTD JUNE 1964 (Autonomous)

होते. बॉक्स ऑफिस वर सुपर डुपर हिट ठरलेल्या या चित्रपटानंतर एकामागोमाग एक हिट चित्रपटांची लाईन लावून दिली. स्वतःच्या "कामाक्षी प्रॉडक्शन" ह्या चित्रपट निर्मिती कंपनीतर्फे १६ चित्रपट प्रकाशित करणाऱ्या दादांनी ४ हिंदी व गुजराती चित्रपट प्रदर्शित केले.

१९७२ - एकटा जीव सदाशिव, १९७३ - आंधळा मारतो डोळा, १९७५ - पांडू हवालदार, १९७६ - तुमचं आमचं जमलं, १९७७ राम राम गंगाराम, १९७८- बोट लावीन तेथे गुदगुल्या, १९८०- ह्योच नवरा पाहिजे, १९८७ आली अंगावर, १९८८- मुका घ्या मुका, १९९० पळवा पळवी, १९९२- येऊ का घरात व १९९४- सासरचे धोतर हे चित्रपट त्यांच्या कामाक्षी प्रॉडक्शन ने प्रकाशित केले. १९८१ साली 'गनिमी कावा' त्यांनी दुसऱ्या (बहुदा भालजींच्याच) बॅनरखाली केला.

एखादयावर पूर्ण विश्वास कसा टाकावा हे दादांकडून शिकावे.... कामाक्षी प्रॉडक्शनची टीम वर्षानुवर्षे कायम राहिली..... त्यात उषा चव्हाण ही अभिनेत्री, राम लक्ष्मण यांचे संगीत, महेंद्र कपूर व उषा मंगेशकर पार्श्वगायनासाठी तर 'बाळ मोहिते' प्रमुख दिग्दर्शन - साहाय्यक..... कुठल्याही 'क्विझ' कार्यक्रमात हा प्रश्न विचारल्यास बेधडक उत्तरे हीच दयावीत........

लागोपाठ ९ मराठी चित्रपटांच्या रौप्यमहोत्सवी आठवड्यांचे 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड त्यांनी केले.

हिंदीतून तेरे मेरे बीच में (१९८४); अंधेरी रात में दिया तेरे हात में (१९८५), खोल दे मेरी जुबान (१९८६), आगे की सोच (१९८९) ह्या चित्रपटांची त्यांनी निर्मिती केली. १९७७ साली पांडू हवालदार ह्या मराठी चित्रपटाच्या धर्तीवर "चंद्र जमादार" हा गुजराती चित्रपट काढला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

सोंगाड्या चित्रपटात त्यांनी नाम्याची भूमिका केली व तीच त्यांच्या जीवनाचा 'टर्निंग पॉईंट' ठरला. नाम्या कलावतीच्या तमाशाला जातो व त्याला तमाशाची चटक लागते हे त्याच्या 'आय'ला आवडत नाही. ती त्याला घराबाहेर काढते व तो कलावतीच्या आश्रयाला जातो व तेथे तो तमाशात नावारुपाला येतो असे हे कथानक आहे. या भोळ्या 'नाम्या' ने दादांना एका रात्रीत यशाच्या शिखरावर नेऊन ठेवले. पण उभ्या आयुष्यात त्याच 'नाम्या' सारखे दादा साधेपणाने वावरले. ताडदेवच्या कामाक्षीच्या कार्यालयात त्यांना भेटायला त्यांचे चाहते महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यांतून यायचे व दादानी त्यांना कधीच निराश परत जाऊ दिले नाही. चाहत्यांबरोबर फोटो सेशन हा त्यांचा वेगळा दैनिक कार्यक्रम असे.. चाहत्यांकडून स्वतःच्या चित्रपटातले संवाद, क्षण वगैरे ते त्यांच्यात समरसून ऐकून घेत. कुणी त्यांना आपल्या मुला- बाळांच्या विवाहाचे निमंत्रण देण्यास येई तर कुणी दुकानांच्या उद्घाटनाचे.. पण 'लांबडी माती' हा पहिला चित्रपट केलेल्या या साध्या भोळ्या नटसम्राटाने स्वतःचे पाय त्याच मातीवर घट्ट रोवून ठेवले होते! त्यांच्या सारखा खरोखरचा 'डाउन टू अर्थ' नट मिळणे असंभव !

वादग्रस्त दादांच्या यशस्वी कारकिर्दीची सुरुवातही वादग्रस्तच असायला हवी, असाच विधिसंकेत असावा..... कोहिनूर सिनेमाच्या मालकांनी दादांच्या 'सोंगाड्या' चित्रपटाच्या आगाऊ आरक्षणाला बगल देऊन देवानंदचा 'तीन देवियाँ' हा चित्रपट प्रदर्शित करण्याचे ठरवले. दादानी बाळासाहेब ठाकरेंना साकडे घातले. मग काय विचारता? शिवसैनिकांनी कोहिनूरबाहेर 'राडा' घातला! कोहिनूरच्या मालकांना सेनेचा दणका मिळताच 'सोंगाड्या प्रदर्शित करावयाचे सांग आणावे लागले.. पण सांगाड्या सुपर डुपर हिट्ट ठरला व मरगळलेल्या मराठी चित्रपटसृष्टीत खळबळ माजली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# दादासाहेब यांचे सुवर्णमहोत्सवी चित्रपटे व

# त्यांची थोडक्यात माहिती





**सोंगाड्या : ५ मार्च १९७१ - कृष्णधवल**

- **प्रथम प्रदर्शन** - भानुविलास थियेटर पूर्ण
- **निर्मिती संस्था** - सदिच्छा चित्र
- **निर्माता** - शाहीर दादा कोंडके
- **दिग्दर्शन** - गोविंद कुलकर्णी
- **कथा** - वसंत सबनीस
- **संगित** - राम कदम
- **गिते** - वसंत सबनीस, जगदीश खेबुडकर, दादा कोंडके
- **कलाकार** - शाहीर दादा कोंडके, उषा चव्हाण, रत्नमाला, निळू फुले, गुलाब मोकाशी

## सुवर्णमहोत्सवी चित्रपट

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)




एकटा जीव सदाशिव : ३१ मार्च १९७२ कृष्णधवल

- प्रथम प्रदर्शन - अलका टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - सदिच्छा चित्र
- निर्माता - शाहीर दादा कोंडके
- दिग्दर्शन - गोविंद कुलकर्णी
- कथा - वसंत सबनीस
- संगित - राम कदम
- गिते - जगदीश खेबुडकर, दादा कोंडके
- कलाकार - शाहीर दादा कोंडके, उषा चव्हाण, गुलाब कोरगावकर, रत्नमाला, निळू फुले, पुष्पा भोसले व शरद तळवळकर

सुवर्णमहोत्सवी चित्रपट

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964




## आंधळा मारतो डोळा : ऑगस्ट १९७३ - कृष्णधवल

- प्रथम प्रदर्शन - मिनर्व्हा टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - सदिच्छा चित्र
- निर्माता - शाहीर दादा कोंडके
- दिग्दर्शन संवाद - दिनेश
- पटकथा - जगदीश खेबुडकर
- संगित - प्रभाकर जोग
- गिते - जगदीश खेबुडकर, दादा कोंडके
- कलाकार - शाहीर दादा कोंडके, अंजना, धुमाळ, जयशंकर दानवे

## सुवर्णमहोत्सवी चित्रपट

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)





## पांडू हवालदार : १ मे १९७५ - कृष्णधवल

- प्रथम प्रदर्शन - अलका टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - सदिच्छा चित्र
- निर्माता - शाहीर दादा कोंडके
- कथा-पटकथा-संवाद - राजेश मुजुमदार
- संगित - राम लक्ष्मण
- गिते - जगदीश खेबुडकर, दादा कोंडके, राजेश मुजुमदार
- कलाकार - दादा कोंडके, उषा चव्हाण, रत्नमाला, अशोक सराफ, रोही ही



COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)





## तुमचं आमचं जमलं : ७ मे १९७६ - संगीत

- प्रथम प्रदर्शन - अलका टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - सदिच्छा चित्र
- निर्माता-दिग्दर्शक-गीतकार - शाहीर दादा कोंडके
- कथा - दत्ता केशव
- पटकथा-संवाद - राजेश मुजुमदार
- संगित - राम लक्ष्मण
- गिते - जगदीश खेबुडकर, दादा कोंडके
- कलाकार - शाहीर दादा कोंडके, अंजना, अशोक सराफ, वसंत शिंदे, गुलाब मोकाशी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

सुवर्णमहोत्सवी चित्रपट




## राम राम गंगाराम : १३ मे १९७७- रंगीत


- प्रथम प्रदर्शन - अलका टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - दादा कोंडके प्रोडक्शन
- निर्माता-दिग्दर्शक - दादा कोंडके
- कथा-पटकथा-संवाद - राजेश मुजुमदार
- संगित - राम लक्ष्मण
- गिते - दादा कोंडके, राजेश मुजुमदार
- कलाकार - दादा कोंडके, उषा चव्हाण, अंजना, अशोक सराफ, धुमाळ




## बोट लावीन तिथं गुदगुल्या : २४ नोव्हेंबर १९७८ - रंगीत

- प्रथम प्रदर्शन - अलका टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - सदिच्छा चित्र
- निर्माता-दिग्दर्शक - दादा कोंडके
- कथा-पटकथा-संवाद - राजेश मुजुमदार
- संगित - राम लक्ष्मण
- गिते - दादा कोंडके, राजेश मुजुमदार
- कलाकार - दादा कोंडके, उषा चव्हाण, रत्नमाला, वसंत शिंदे, पद्मा चव्हाण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964




## हयोच नवरा पाहिजे : ५ सप्टेंबर -१९८० इस्टमनकलर

- प्रथम प्रदर्शन - अलका टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - दादा कोंडके प्रोडक्शन
- निर्माता-दिग्दर्शक - दादा कोंडके
- कथा-पटकथा-संवाद - राजेश मुजुमदार
- संगित - राम लक्ष्मण
- गिते - दादा कोंडके, राजेश मुजुमदार
- कलाकार - दादा कोंडके, जयश्री, शरद तळवळकर, रत्नमाला, मास्तर भगवान

**सुवर्णमहोत्सवी चित्रपट**

COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
Autonomous




## आली अंगावर : १३ मे १९८२ इस्टमनकलर

- प्रथम प्रदर्शन - अलका टॉकीज पुणे
- निर्मिती संस्था - सदिच्छा चित्र निर्माता
- दिग्दर्शन-गीतकार - दादा कोंडके
- कथा-पटकथा-संवाद - राजेश मुजुमदार
- संगित - राम लक्ष्मण
- गिते - दादा कोंडके, राजेश मुजुमदार
- कलाकार - दादा कोंडके, उषा चव्हाण, शरद तळवलकर, रत्नमाला, वसंत शिंदे

सुवर्णमहोत्सवी चित्रपट



दोन मराठी सम्राट यांचं अनोखं नातं हिंदुहृदय सम्राट माननीय श्री बाळासाहेब ठाकरे आणि दादासाहेब कोंडके यांचा एक सुंदर फोटो

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असलेला विद्यार्थी आर्यन रविंद्र जाधव सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प "दादांचे सुवर्णमहोत्सवी चित्रपट" हा या विद्यार्थ्याने स्वतः तयार केलेला असून, आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीत्या पूर्ण झालेला आहे.

दिनांक: २९ / ४ /२०२३

ठिकाण: कोल्हापूर

डॉ. एस. आर. कट्टीमनी
विभाग प्रमुख,
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

प्रा. नम्रता ढाळे

प्रा. अश्विनी खवळे